सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४९२/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk२@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https : dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/संस्थास्तर प्रवेश/२०२४/६६८ दिनांक : - 4 SEP 2024

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एमबीए आणि अभियांत्रिकीसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा तसेच संस्थास्तरावरील जागांवर प्रवेश करताना नियमांचे पालन करण्याबाबत...**

**संदर्भ : मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्रमांक १२२३/प्र.क्र.०३/ केंप्रप्र/२०२४/ १५३९, दिनांक ०२.०९.२०२४**

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेकडे सहसचिव, युवासेना, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरीत राहिलेल्या रिक्त जागा तसेच संस्थास्तरावरील जागांवरील प्रवेश प्रक्रियेसंदर्भात पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकांमधील मुद्दा क्रमांक १३ (पदवी व पदव्युत्तर पदवी माहिती पुस्तिका २०२४-२५ पृष्ठ क्रमांक ७९) अन्वये प्रवेश प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये कळविलेले आहे.

याअनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेच्या संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर उपरोक्त तरतूदींनुसारच प्रवेश प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्यात यावी. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्यानुसार नियमबाहय पध्दतीने प्रवेश झाल्याचे सिध्द झाल्यास असे प्रवेश प्रवेश नियामक प्राधिकरणाचे स्तरावर रद्द होतील, याची स्पष्ट नोंद घेण्यात यावी.

( डॉ.विनोद मोहितकर )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना माहितीस्तव व सदर परिपत्रकास आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावरून प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -

१) सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर त्यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास सदर परिपत्रक आणावे व या बाबतची अंमलबजावणी काटेकोटपणे होईल याची दक्षता घेण्यात यावी. सदर परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

२) माहिती तंत्रज्ञान कक्ष (कार्यासन क्रमांक ३) मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करण्यात यावे.